म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५६०

# कलिका

प्रा. तुकाराम पाटील



REFBK-0025387
REFBK-0025387

संदर्भ काव्य
२५६०
~~२५५८~~
२५३८८
२५।८।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६०
ग्रा. क्र. २५३८८
काव्य २५।८।८८
शाखा (स्थळ प्रत)

# कलिका

(काव्यसंग्रह)

प्रा. तुकाराम पाटील

REFBK-0025387
REFBK-0025387

प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर-४१६ ००८

| | |
|---|---|
| कलिका | Kalika |
| प्रा. तुकाराम पाटील | Prof. Tukaram Patil |
| प्रकाशन क्रमांक/तीन | प्रथम आवृत्ती फेब्रुवारी/१९८७ |

प्रकाशक
दिलीप गवळी
२० प्रतिभानगर मार्केट
सागरमाळ, कोल्हापूर- ४१६ ००८

मुद्रक/-
श्रीपाद सीताराम गोसावी
राजहंस प्रिंटींग प्रेस
नागाळा पार्क-कोल्हापूर. ४१६ ००३
फोन नं २३९०६

मूल्य रुपये २०/-



© प्रा. तुकाराम पाटील
मु. पो. भोसे
ता. मिरज,
जि. सांगली



मुखपृष्ठ / स्टुडिओ मयूर / मधुकर ओतारी    ब्लॉक / उदय प्रोसेस

– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
२० प्रतिभानगर मार्केट
सागरमाळ, कोल्हापूर- ४१६ ००८

# अर्पण पत्रिका

मा. विश्वनाथआण्णा पाटील    मा. बाळासो रा. पाटील (काका)
भिलवडी





तडफदार व्यक्तिमत्त्वात निष्कलंक चारित्र्याचे
असीम दर्शन ज्यांच्यात घडते त्या
दिलदाराना सविनय अर्पण

लेखक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६२
काव्य
२५३८८
२५१८८८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# अंतर्मुख करणारी कविता

मराठी भाषेमध्ये आज कथा आणि कादंबरी यांचे उदंड पीक माजू लागले आहे, परंतु चांगली कविता सहज वाचायला मिळत नाही. जी कविता वाचकाला मोडते आणि जोडते, आनंद देण्यापेक्षा अंतर्मुख करते. विचार करायला लावते, तीच चांगली कविता मी मानतो. प्रा. तुकाराम पाटील यांचा " कलिका " हा संग्रह हातात आल्यानंतर वरील विचाराचे पूर्णपणे समाधान झाले.

भामनाथाच्या डोंगरावर संत तुकारामाने अभंग लिहिले नाहीत तर तो अभंग जगला. तुकाराम पाटील यांनी कविता लिहिल्या आहेत असे वाटत नाही, पण ते कविता जगले आहेत, त्यानी कविता भोगल्या आहेत असे वाटते.

कविता वाचायची नसते, अभ्यासायची नसते, तर ती जगायची असते, आणि या जगण्याचा अनुभव तुकाराम पाटील यानी घेतला आहे. थंड पाण्याने थंड पहाटे आंघोळ करावी, पारिजातकाची फुले अंगावरती पडावीत आणि साऱ्या शरीरातील रक्त गोठून जावे, त्याची फुले व्हावीत अशी ही कविता आहे.

आपल्या कविता संग्रहाला शीर्षक देत असताना त्यानी ' कलिका, असे नांव दिले प्रथमेचा चंद्र, पौर्णिमेपर्यंत जातो, कळ्यांची फुले होतात, त्यामुळे आजची ही कवितेची कलिका आक्रोडाचे झाड होईल.

असे सांगितले जाते की नरगिसच्या वेलीवर शंभर वर्षांनी फूल येते, कदाचित या कविला हे फूल त्याच्या ऐन तारुण्यात सापडले असेल.

पायवाट, अपेक्षा, शेला या कवितेमधून हा कवि प्रणयाचे नाजूक चित्र पहातो, तर गुलाम, भिकारी, छळवाद या कवितेमध्ये जीवनाचे

दाहक दर्शन घडवितो. स्वप्नांच्या निळया राईत अडकलेल्या प्रा. पाटील यांचे वास्तवाचे भान संपलेले नाही आणि म्हणूनच केशवसुतांच्या नंतर

या शब्दानो बनून अंध
न्यायाचा कंद बनून या

असे स्वत:चे शब्द सामर्थ्य तो प्रकट करतो.

स्वप्नाचा रंग निळा असतो, ही स्वप्न स्वप्निल डोळयात जपायची असतात, जाणायची असतात, तिच्या मनातील भावना अंतरात जाणायच्या असतात. परंतु मनाच्या दुष्टचक्रात या भावना गडद काळोखाचे रूप घेऊन येतात, याचेही भान त्यांना आहे.

आज मराठीमध्ये जानपद गीतांची रचना जवळजवळ संपली आहे. ग. ल. ठोकळ यांचे ‘ गाठोडं तिथं राहुद्या ’ हे आजही मनावर भुरळ घालतं. ‘ कुठवर चालायचं ’ या ग्रामीण काव्यात या कवीने स्वत:चा आणि समाज मनाचा शोध घेतला आहे.

‘ कलिका ’ हा संग्रह वाचल्यानंतर यात प्रेमगीतं आहेत, जानपद गीतं आहेत, भक्तिगीतं आहेत, पण या सर्वांच्या बरोबर स्वत:चा स्वत: कविने घेतलेला शोध आहे.

मराठी माणसांना कविता संग्रह विकत घेऊन वाचायची सवय नाही एस. टी. तून प्रवास करीत असताना दुसऱ्याचे वर्तमानपत्र वाचणे त्यांना कौतुकाचे वाटते. मराठी भाषेच्या दृष्टीतून ही अतिशय दुर्भाग्याची गोष्ट आहे. त्यामुळेच मराठी कवितेमध्ये ‘ कलिका ’ या संग्रहाने भर पडणार असली तरी, या कवितेला न्याय मिळेल.

म्हणूनच या कविच्या शब्दात ‘ ताकद असली तरिही या कविला न्याय देणे मराठी माणसाला कबूल करावे लागेल ’ असे वाटते.

**डॉ. स. ग. यादव**
स्नेहसागर, कसबा बावडा
गोळीबार मैदान, कोल्हापूर.

# अनुक्रमणिका


१) कलिका
२) या शब्दानो
३) पायवाट
४) वास्तवतेच्या पल्याड
५) चैत्रवेल
६) साथ
७) स्वप्नजा
८) संगत सोबत
९) सांजवात
१०) भूक
११) घन मेघानो
१२) झाली धरित्री माऊली
१३) अपेक्षा
१४) शब्द
१५) गुलाम
१६) कातळ
१७) इमानी
१८) गरजू
१९) मोठे कोडे
२०) चढणीच्या वाटेवर
२१) आमच जगण
२२) थाप
२३) शेला
२४) भिकारी
२५) छळवाद
२६) केवडयाच कणीस
२७) उद्धार
२८) मुसाफिर
२९) तुफान
३०) मी सरलोय
३१) भल्या जगणाऱ्या
३२) विसरलेले गीत
३३) नाते
३४) शुन्य
३५) तेज प्रभेचे
३६) माणूसपण
३७) प्रश्न
३८) गुंता
३९) कुठवर चालायच
४०) टिळा गंधाचा
४१) शिल्प
४२) मिलनाधीरा
४३) अनोखा शाप

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# कलिका

दव बिंदूंच्या शिडकाव्यानी
ना खुलशी तू तेंव्हा
होऊनी स्तंभित मुकपणे तू
बससी जेंव्हा जेंव्हा

दाही दिशातून वात नाचरा
येई तुज हसवाया
परी पाहुनी निश्चलता तव
निघतो पुढती जाया




तुझ्या अंतरी गंध सुगंधी
अमोल ठेवा वसतो
लुब्ध होवूनी त्या वरती तर
भुंगा गुंजारव करतो

रूप देखणे तुझे मनोहर
हिरव्या बुरख्या आड
कधी ना सुटते तरी ही पण ते
मुरल्या नजरे तुन द्वाड

या सृष्टीचे भाट आवघे
गाती तुझेच गीत
नसते गावी तुझ्या परी ते
असली तर तव रीत

रूप देखणे जिथे मनोहर
गर्व तिथे का वसतो
या जगतातील एक अनोखा
रिवाज होवून बसतो

निसर्ग देतो रूप लाखातील
दुःखीत जगता हसवाया
परी ना कुणा तमा तयाची
सजती सगळी फसवाया

गावून नाचूनी ताल धरावा
वाटे तुझीया भवताली

पण निश्चल तू सदा रूसावे
मावळते गाली लाली

मिटूनी डोळे अन संकोचून
ध्यान कुणाचे करशी
कुणी लावला ळळा तुलागे
वाट कुणाची बघशी

अर्धोन्मिलित तव नेत्रावर
आज लाज का यावी
रूप नगरीची राजकुमारी
कशी बावरी व्हावी

कोणासाठी शृंगाराचे
ल्यालीस इतुके आझे
अन कोणाचे पाऊल नाजूक
तव हृदपटली वाजे



हळू हळू अती हळूच उलगडे
गोफ तुझीया भावांचा
नकळत मग तो दर्प दरवळे
अबोल तुझीया प्रितीचा

अधिर अधिर अती अधिर बनावे
हे तर प्रितीला साजे
अन मौनातून सर्व गवसते
स्वप्नील मनी तव जे जे

नकळत गुंफून एक गोफतू
झालीस वेडी वेडी
ही गंभीरता दे सोडून तव
हसूनी गाली थोडी

अबोल ओठी हास्य खुलाया
झाली जादू कसली
मुग्ध कलीका पुष्प होवूनी
कैसी हसली हसली.

# या शद्बानो

या शद्बानो घेऊन गंध
होवून धुंद भाव वेडे
आज मला गावू द्या गीत
होवून व्याकूळ थोडे थोडे

या शद्बानो अलंकार लेवून
धनीक होवून शृंगारलेले
होवू द्या मला ही कल्पनांचा कुबेर
भोगू द्या क्षण मंतरलेले

या शद्बानो लेवून साज
प्रितीचे आज होवून दूत
बेहोष होवून मला ही नाचू द्या
झपाटल्याने प्रेमाचे भूत

या शद्बानो बनून अंध
न्यायाचा छंद घेवून या
मला ही तसेच आंधळे बनून
न्याय अन्याय जोखू द्या

या शद्बानो पाजळून धार
करायला प्रहार अन्यायावर
प्रलयकारी बनवा मला ही
करायला तांडव पापाच्या उरावर

# पायवाट

आज परतूनी वाट पुराणी
आली पायाखाली
अनामिका ती जुनी बंधने
पाय खुणांची ल्याली

पाय चिमुकले होते तेव्हा
ठसा चिमुकला उठला
बागडता तिजवरी आनंदे
क्षण सोन्याचा टिपला.

षोडशवर्षी उनाड बनता
ती तर मज आवडली
भलत्या सलत्या खोड्या करता
मज संगे धडपडली.

स्वप्निल होऊन शतदा तिजवर
धाव धावूनी थकलो !
कितीदा आणिक धुंद होऊनी
घनतिमिरी मी चुकलो.

बागडता धुंदीत आपुल्या
तीच सखी मज झाली
काळ वेळ ती विसरून सारे
मज रिझवाया आली.

कितीदा दु:खी मित्र होऊनी
ती मज संगे बोले
आणिक स्वप्नी धुंद होऊनी
बरोबरीने चाले.

माझ्या संगे होऊन आगतिक
कितीदा तरी ती रडली
आनंदाच्या अन ऊर्मिने
खुळ्यापरी बागडली.

मौलिक माझी पायवाट ती
किती राहिली दूर
सुखात असता आज इथे मी
मनी परी हुरहुर.

# वास्तवतेच्या पल्याड




मूक मनातील जळणारी व्यथा
जेंव्हा शद्वातून साकार होते
तेंव्हा हृदयाची झालेली राख
अश्रुंच्या पुरातून वाहून जाते

सुख दुःखाचा उनपाऊस
अंगावर झेलत जगत जातो
अन विश्वासाच्या खुल्या मैदानात
कधी वटतो कधी फुलून जातो

जगून मरतो मरूनही जगतो
हेच माझे जीवन नीत्य
कठोर असलं तरी ही तेच
तुमच न माझ अपूर्व सत्य

सरण व्यथांच रचल आहे
त्यातच अखेर जळण आहे
आणि जळून जळून शेवटी
सोन्यासारखं उरण आहे

जिला जगाचं एक स्तोम आहे
हलव्या कोमल मनाची नाती
अखेर वास्तवतेच्या पल्याड
सगळी सगळी भेदातीत माती

# चैत्रवेल

मंतरलेली चैत्रवेल
खरंच का ग सुकली आहे
हसरा भाव टाकून सारा
कुणावर ग रूसली आहे ?

छान फुलली फुलं दोन
का ग झुकली खाली आज
करूणाच सारी दिसली त्यात
कुठे ग लपली नाजूक लाज ?

हिरवजर्द प्रीती पान
वाऱ्या संगे झुललं नाही
नाजूक नवथर कळ्यातून
हसू का ग खुलल नाही ?

नको बाई असं करू
थोडा तरी धीर धर
बरसेल बरं वरूण आता
अग, मन घट्ट कर.

# साथ

शांत धुंद रात आहे
तुझी मला साथ आहे
नदी काठी रात निळी
गार वाळू पाया तळी
मिठीत तुला घेताना
सारे स्तब्ध होत आहे
शांत धुंद रात आहे.

फुल हळू फुलताना
गंध त्याचा खुलताना
चांदण्यांच्या वर्षावात
मंद वारा गात आहे
तुझा हाती हात आहे.

छत नीळा शुभ्र तारे
वृक्ष वेली गुंग सारे
मूक झाल्या दाही दिशा
सार तुला ज्ञात आहे
हीच खरी प्रित आहे.

सुख दु:ख देता घेता
एक रूप झालो आता
जीव दोन एक आत्मा
तुझा माझा झाला आहे
दुजाभाव गेला आहे.

# स्वप्नजा

स्वप्नजे स्वप्निल नयनी
एकदा येवून जा
भाव तुझी या अंतरीचे
जा मला सांगून जा

वाहता ओघात कोठे
त्या गतीला बंध व्हाया
तू सूकाणू का न व्हावे
सर्वस्वाते वाचवाया

या मनाच्या दुष्ट चक्री
चैतन्य सारे लोपताना
तू तुझ्या शक्तीसवे मम
अंतरी संचारूनी जा

कल्पनांच्या गडद तिमिरी
तू विजेचा लोळ व्हावे
आणि तुझी या प्रखर तेजे
मार्ग माझा दाखवावा

भावनांच्या प्रखर प्रलयी
रौद्र रूपे नाचताना
वास्तवाच्या अंकूशानी
धाक तू ही दाखवावा

तू तुझ्या रूपा सवे ये
अमृताते घेवूनी
देवूनी संजीवनी तू
सुप्त वन्ही चेतवावा

# संगत सोबत

ग्रंथालय ठाणे
काव्य

पाळलेस का मौन सखे तू
जडवूनीया नाती
तुझीन माझी संगत सोबत
फुलेल एकांती - - -

तवस्पर्शातून मला मिळावी
उमेद आणिक सदा फुलावी
फुलल्या वेली वरी राहुदे
गंधीत तव कांती - - -

सुरासुरांचा मिलाप व्हावा
प्रित तराना मिळून गावा
सप्तसुरांचा साज छेडीता
दूर सरो भ्रांती - - -

नच प्रीती ही चिवट बंधने
गोफ गुंफतील मनची सुमने
त्या सुमनांच्या दलादलावर
वसेल तव प्रीती - - -

धुंद मधुर तव सहवासातुन
फुलून उमलुदे माझे जीवन
उज्ज्वल माझ्या यशोप्रभेची
तू कर नव क्रांती - - -

# सांजवात

दिप्तीमान हे तेज प्रभेचे
क्षितीज्यांतरी विरते
तिथे मी सांजवात लाविते

धुंद मंद या संध्या समई
बने अचेतन ती वनराई
सरली धडपड सरली घाई
मूर्त धरीत्री अमूर्त बनूनी
अंधःकारी विरते

शिणला रविकर दूर चालला
ठेवून मागे अंधाराला
चर अचरांच्या विश्रांतीला
थकल्या शिणल्या जीवासाठी
शांतीपर्व प्रकटते

सत्य शिव अन सौंदर्याला
निज ऐकत्राचा वेध लागला
म्हणून संध्या समय प्रकटला
या त्रिरूपा घेवून अंकी
शक्ती जोजाविते

मांगल्याची मंगल मयता
विश्वमोहिनी सांज देवता
अशी वर्णिते इथे मुकता
मिणमिणत्या ज्योतीने इवल्या
पूर्ण ब्रह्म उजळते

पाप विमोचन होवून जावे
सुख संसारी माझ्या यावे
एवढेच प्रभू तू मज द्यावे
तुझी या चरणी लिन होवूनी
मी पण माझे सरते

# भूक

या परिसरातले सुवर्ण कण, ओंजळीत घेवून मी उभा आहे.
भूके पोटीच घेतलेत ते, पण भूक माझी झोळीत आहे.
अनोळखी भूक ही असंख्य वाटांची
शब्द ब्रह्माच्या नाद गंधाची
जित्यामेल्यांच्या अस्तित्वाची
भूत-भविष्याच्या खुमासदार चविची
खा, खा, खाऊनही कधीच ना संपायची
तृप्तीचा देवून ढेकर कधीच नाही सुखवायची
वाढती अशी भूक ही माझ्या पक्क्या झोळीत आहे
घेऊन तिलाच सोबत मी गावोगाव फिरतो आहे
भूक अनोळख्या किमयेची
कधी ना लाचार व्हायची
रिते हात हलवत कोठून
कधीच नाही परतायची
मुळापासूनच घेवून सगळं
मुळ सुद्धा सहजतेन पचवायची
आणि त्यावर घालू हळू फुंकर
एक एक विशाल वक्ष फुलवायची
माझ्यासाठी माझी भूक लाखातली एक आहे
तिच्यासाठीच म्हणून मी फार काळ जगणार आहे.

# घनमेघानो

आकाशीच्या घनमेघानो बरसा जलधारा
मुदित मनाने हर्षानंदे आज न्हाऊदे धरा - - -

आनंदे करताल धरूनिया पल्लव गाती गानं
तृण पाती अन् वेल फुले ही डुलती विसरून भान
हर्षीत मारूत मधुर खाची मारी अमीट तान
तन, मन, जीवन होईल पुलकित पिऊन चावरा वारा

नभी दाटल्या जलकुंभातून संजीवन जणू झरते
मुग्ध होऊनी वसुंधराही अमृत पाना करते
पूर्ण ब्रह्म उदरातून तिची या निसर्ग होऊन येते
अचेतन जगी सचेत होऊन करते हुंकारा - - -

पर्वत दुहिता जलभारे जणू गर्वोन्नत होती
सालंकृत नववधू जशा या पतिगृही जाती
वृक्ष वेली या तटावरूनी तिज निरोप देती घेती
आसमंत भवताली सारा करितो मंत्रोच्चारा - - -

नवतेजाचे नवभरवारे आज इथे वाहते
आनंदाच्या कल्लोळी हे विश्व असे डुंबते
धुंद होऊन निसर्ग देवी जीवन संगीत गाते
सुप्तामधले तेजःकण हे घेती आकारा - - -

# झाली धरित्री माऊली

झाली धरित्री माऊली
झड श्रावणाची प्याली
बीज अंकुरले पोटी
लेणं सौभाग्याचं ल्याली
अंगी शिवार हिरवं
साडी चोळीची किनार
नद्या ओढ्या नाल्यांचे ते
कंठी घातलेत हार
दऱ्या डोंगर सारेच
पाना फुलानी सजले
स्वर्गी नांदल्या देवाने
दान दागिन्यांचे दिले
रूप गोजिरे लेवून
पीकं सारी तरारली
अती नाजूक धरेन
शाल अंगी पांघरली
पीक पोटरीत आलं
उभं शिवार नाचलं
धरित्रीच्या कानामधी
डूल मोत्याचं डुललं
नाही सोस तिला त्याचा
देते मानवाला दान
स्वार्थी सदाचा मानव
नाही त्याचं त्याला भान

# अपेक्षा

जग बेटचा जग
अरे तुला जगलं पाहिजे
फुटकं गाडगं तुझं तुला
कुठ तरी भाजलं पाहिजे
    पक्यांच्या या बाजारात
    तुझ्या कच्याला मोल काय
    कशाला घेवून मिरवतोस फुकट
    अैकत सूर हाय ! हाय !
शंढांच्या बाजारातील
पिंडांची इथं विक्री आहे
केवळ जगणारांचीच ही
दिंडी पुढं जाते आहे
    हो सामील दिंडीत या
    खंडीत ओघ करू नकोस
    मिजास तुझ्या तत्वांची उगाच
    इथं कुणाला दाऊ नकोस
जूनं सारं मरून गेलंय
मरणारं कसं उठेल पुन्हा
मेलंय सगळ तू ही मर
कच्चं रहाण्यात होतोय गुन्हा
    जून्या आव्यात भाजलेले
    झाले हिरे मागे तेंव्हा
    तुका, नामा, एका ज्ञाना
    मुक्ता बहिणा नाहीत पुन्हा.
जूना ताव तुला नाही
कारण तू मुळातच फाटका
जन्मताच अरे वेडचा
घेतलास नव्या संस्कृतीचा घुटका
    म्हणूनच तुझं मडकं फुटक
    हिरा कधी होईल काय ?
    जून्यासारखा नवा हिरा
    एखादी माय प्रसवेल काय ?

# शब्द

आज ओठावर स्फुरते गीत
नवखे लाजाळू शब्द जमतात
आणि वर लाजत लाजत
गावून जातात जीवन संगीत

ताल तोल मोजून मापून
निरस गोंडस बनुन आज
नव्या लाजऱ्या नवरीपरी
जातात हळूच खुदकन हसून

हृदयस्पर्शी घेवून व्यथा
तेच शब्द बनतात वैरी
उरावर बसून घालतात घाव
रंगते नव्याने जुनी कथा

कधी वज्राहून कठीण होवून
भरतात पीळ जोमाने
मरणप्राय यातना होतात
स्मृति रक्ताने जाते न्हावून

आकार निराकार फोल शब्द
मौल्यवान पण तेच ठरतात
घेवून हाती रूपडे त्यांचे
मानव जात बनते स्तब्ध

# गुलाम

शद्ब आता सगेच माझे
तुझ्या ओठात अडकून पडलेत
कारण तुझ्या नयनांच्या जलाशयांना
शद्ब कारंजांच आलय रूप
मी बसतोय त्यांचे अर्थ लावित
हरवून माझा माझ्यावरचा भरवसा

होतोय एक गुलाम आज्ञाधारक
तुझ्या त्या बोलक्या नयनांचा
ओठ ही विलग न करताच तू
सारं काही सांगून जातेस
माझ्या काळजाचं फुलपाखरू करून
त्यालाच सोबत घेवून जातेस

कमल पुष्पाच्या मिटल्या दलात
भ्रमरानं स्वतःला कोंडून घ्यावं
तसं माझं अस्तित्वच आता
सारंसारं तुझ्या स्वाधिन व्हावं.




# कातळ

वाटलं होतं तुझी प्रित काळा कातळ होता
मी कोरू पहात होतो त्याच्यावर
आलेख संवेदनांचे
माझ्या हळव्या शब्द साधनांनी
भिती होती,
एखाद्या शब्दाचा कठू आघात झाल्यावर
भंगेल तो कातळ
मग माझ्या स्वप्नांचा
नाही आकार देता येणार त्याला
पण तो कातळ कातळच नव्हता
तो होता कोरडचा मातीचा ढिगारा
बरसणाऱ्या मेघातील जलधारानाच
गढूळ, व्याकूळ करणारा.



# इमानी

ज्या दिवसानी माझी पारध केली
त्यानीच मला पारधी बनवलंय
म्हणून उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाची
मी बेगुमान चपलक हत्या करतो
आणि नाचो त्यांच्या उरावर
होऊन बेभान - - -
दिवस मासांचे भुले बुरेपण
मी दाबतो माझ्या कणखर मुठीत
कारण जळणाऱ्या हळवेपणाच्या ज्वाला
मलाही पोहोचवतात धुंद आसमंतात
माझ्या मनाचे करून
बेदरकार तुफान - - -
या तुफानाच्या झंझावती माऱ्याने
माझ्यातलं मी क्षणोक्षणी संपतोय
आणि उरतोय मागे उरफुटेतो धावणारा
एक जबर शिकारी शिकार करणारा
पण मृत्यूशी अभावितपणे
राखणारा इमान - - -

# मोठे कोडे

थोरामोठ्यांच्या संगतीतले
क्षण सोन्याचे असतात म्हणे
सामान्यांच्या वाट्याला पण
शून्यातूनही एक उणे

सगे सोयरे गणगोत
सारे ठिकाणावर लावून मग
मधाचं बोट तोंडाला लावून
झुलवत ठेवायचं असतं जग

कुणी खादी, कुणी भगवे
लेऊन व्रतस्थ झाले होते
सेवाभाव दाखवून आपला
स्वत:साठीच जगले होते

जगता जगता करून माया
सारे ठेवून मरून गेले
जाताना हाती नव्हतं काही
रिकामे आले रिकामेच गेले

रीत बदलून निसर्गाची
म्हणतो मानव मीच मोठा
शेवटी कळतो ज्याचा त्याने
जोपासलेला अभिमान खोटा

खोटं जग खोटी माया
सगळं काही खोटं खोटं
खोट्यासाठी खोटं जगणं
जगातलं एक कोडं मोठं

# गरजू

असेच एकदा
तुझ्या गरजेपोटी तुझेपण
माझ्या स्वाधीन
तुझी गरज म्हणून- - -
सरली गरज
घेऊन गेलीस सारेच तुझे तू
तुझ्या पदराखालून
आता पालटली बाजू- - -
आज गरजेचा पीळ मीच भोगतोय
होऊन गरजू- - -

# चढणिच्या वाटेवर

दाताखाली मुडपून ओठ
घालून कुलूप शब्दाना
मनाचे जीतेपण
डोळ्यानीच साकारायचे- - -
श्वासाने वरखाली
होणाऱ्या वक्षानेच
अचूक वज्राघात करून
मेरूमंदार नमवायचे- - -
तालबद्ध चालण्यातून
करत करत आक्रमण
चढणिच्या वाटेवर
पुरुषार्थांस छेदून जायचे- - -

# आमचं जगणं

आमचं जगणं आजारलंय बेटं
त्याला बरं कधी वाटतच नाही
छान आहे, बरं आहे
उगीचच आपल म्हणत खोटं - - -
काही स्वतंत्र, काही संसर्गजन्य
झालेत याला भयाण रोग
तरी ही बेटयाला हवेत बरका
नव्या निर्मीतीचे नवे नवे भोग
भूत, चेटूक, कर्णपिशाच्च सारं
यानं कधीच उगाळून प्यायलंय
ठेवलच नाही काही मागपुढं राखून
म्हणूनच तिरडीवर येवून ठेपलंय
घडतंय हे सारं नव्हे बरं खोटं - - -
क्षणात गढूळतय, क्षणात निवळतय
क्षणात रडतय, हसतय क्षणात
धादांत वैचित्र्याचं धरेवरच पावूल हे
जिवटपणे टिगुन आहे तापलेल्या उन्हात
तगमग्र तडफड धडपड याची
सतत अनिवार चालूच आहे
काळाच्या प्रखर ज्वालापुढे नेटानं
रांगडपण अजूनही टिकून आहे
किती तरी आगळं हे आकरीतच मोठं - - -
हुशार शल्य विषारद हवा
याला रोगातून करायला मुक्त
हुडकायचा कुठं कळतच नाही
स्थायिक नाहीत कुणी ही प्रवाशीच फक्त
तुम्ही आम्ही इथले सगळेच प्रवासी
आज ना उद्या जाणार आहोत
सुखदुःख सारं टाकून इथंच
जगण्यालाही एकदा मुकणार आहोत
यातच दडलंय एक सूख मोठं - - -

# थाप

मला सुखानं जगायचं आहे
म्हणून सारं ठरवून असतो
घसरून पाऊल माझा मीच
मलाच मी हरवून बसतो

ठरवलेलं सारं जळून जातं
जन्म देवून पुन्हा नव्या रूपास
जळणारं स्मशान जळत रहातं
जगण्या मधला सोडून हव्यास

भलबुरं सारं मी सोडून देतो
कशातच रस वाटत नाही
जगण्यामधला सोडून चार्म
मला कधीच चालत नाही

पोटासाठी पाप करतो
पोटच पचवतं माझं पाप
पण स्वच्छ सुंदर नीती
उगीच भोगते खुळे शाप

पाठी लागलंय पोट माझ्या
अवघ्या धरेवरचं पाप
जगणं नव्हे केवळ आहे
जीत्या जीवाची शुद्ध थाप

# शेला

हळूवार आलगद अनोख्या बंधानी
न कळत सहज घडवली कहाणी
अखंड वस्त्राची झाली नवीविण
शृंगारले यौवन एकरूप जीवानी

किनखापी किनारीच्या जरतारी वस्त्रावर
नोंदवलास तू तुझं मूक हस्ताक्षर
व्यथा वेदनांच्या लेवून आलेले
अमंगल मला ते पुन्हा सारं घडल्यावर

नव्या नवलाईनं नवं हवं तसं बेतलं
भेट म्हणून अनोळख्यास देवूनही टाकलं
तृप्तीची व्यथा झाली तेजाची धार
सुप्तातील बीजं एक अंकुरून उठलं

मिटून काळजातील व्यथांची हुरहूर
ताडमाड वाढ वाढला तो अंकुर
आत्मविश्वास त्याचा दुणावला पुरता
गेली जळून सारी व्यथांची हुरूहुर

नितांत सुखाच्या शैयेवर पहुडला
त्याला हवं मग ते जूनं वस्त्र कशाला
अंतरी कुठंतरी सलणाऱ्या व्यथांचा
शेला मात्र हवेत जोरानं फडफडला

# भिकारी

मी भिकारी धरेवरचा
भिक सारखी मागतो आहे
वाटा मला अनंत हस्ते
माझा खळगा रीता आहे
रीता खळगा भरण्यासाठीच
सतत सतरा वर्षे गेली
भूक कधीच शमली नाही
उलट तिची आगच वाढली
पंचेंद्रीयांची करून तोंड
शड:विकारानाही गिळल आहे
चावूक किरकोळ सार मिळून
हावऱ्या सारख गिळल आहे
झोळी भिकेची काखेस लावून
दार न् दार मी टिपतोय
कल्पकतेच्या कुबेरा घरी
माझा आलख मी बोलतोय
तिन्ही काळ तिन्ही वेळ
माझ्या भूकेला खंड नाही
सदा सर्वदा राहून भिकारी
भीक मागण्यास लाजत नाही
घरदार निसर्ग समाज
सगळयांकडे मागमागतो
उदार हस्ते देतात सारे
त्यानेच मी धन्य होतो
जीवनभर भिकारीच राहून
जीवाच्या झोळीत टाकाव ज्ञान
आणि अखेर सरताना ही
त्याच झोळीच रहाव भान

# छळवाद

कुंतली माझीया शोभे, निशिगंधी सुगंधी गजरा
नयनात आजवरी रूजल्या, प्रितीच्या मोहक नजरा
पायात बांधले चाळ, असे लडिवाळ, प्रितीचा खेळ
उरी ग बाई रूतला
देहात धुंद शिरसिरी, हा उरी, घाव जिव्हारी
कसा ग बाई बसला
ही मोहक कांती, का एकांती, स्मरते राजकुमारा ।। १ ।।

तालात माझी ही चाल, नसे बेताल, मनी ही पाल
परी कुचकुचली
धुंदीत सरावी रात, नको एकांत, जीवीया भ्रांत
होऊ घातली
ही मूक भावना, छळे परी मना, होवून तुफान वारा ।।२।।

मी अबोल बनते, मनात कुढते, मनीच रडते
उगी मोकलून धाय
अती शिणले बाई, कळले नाही, मज लवलाई
करू गत काय
मी सोसून थकले,हताश बनले,छळवाद प्रितीचा पुरा ।।३।।

# केवड्याचं कणीस

नटून थटून उगच कशाला
लचकत मुरडत आलीस रानात
खोडील उन्हान बघून तुला
फुकला की मत्तीर पिकाच्या कानात

गच्च भरल्यालं सोन्याचं शिवार
तू आलीस तसं बावारलं
दाबून हासू गालातल्या गालात
निरखून वघताच पाघाळलं

छातीवरचा बघून उडत्याला पदूर
वारंच लाजून चिडीचिप झालं
नाजूक पायाचं चालणं बघून
रस्त्यातलं चघाळ बाजूला गेलं

भुरभुरत्यालं लुईवरच कत्रास
उनानं उगच चाचपून घेतलं
आपल्याच बुडी यावीस म्हणून
समद्याचं झाडानी मांडाव घातलं

केवड्याचं कणीस दिसलीत
झाडा माडानं हुंगून घेतलं
बघवना समद रानच्या फुलाना
म्हणून त्यानी डोळंच मिटलं

# उद्धार

मायभुमीच्या पायातले
जडशील लंगर तोडण्यासाठी
अनेक ज्ञात अज्ञातानी
वाहिले स्वप्राण स्वातंत्र्याच्या वेदीवर
झाली पहाट, उगवला सूर्य
वाटलं होतं आता तरी
फुटेल गहिवर माणूसकीच्या आमच्या आत्म्याना
पण सगळंच ठरलं फोल
विजयात ही आमच्या, आमचा दारूण पराभव
अन्नालाही महाग होण्याची पाळी
आम्हीच आमच्यावर लादून घेतली
सारीच चाकोरी बदलून टाकली
लोकशाहीच्या पवित्र अवरणात
दडलेत सारे पिंडावर टपलेले कावळे
जनसामान्यांच्या मतावर पोसलीत
पाठीत सूरा खूपसणारी कोंडाळी
धर्म कर्मांच्या अनेक बंधनानी
आमच्या तिरड्या आवळून ठेवल्यात
मेलेल्या मढ्यांच्या उरावर नाचायला
वंश परंपरेचे अनेक वळू पोसल्यात
तेच आमचं दफन करून
करतील सारा चोख व्यवहार
आईला आपल्या गहाण ठेवून
फक्त स्वतःचा करतील उद्धार

# मुसाफीर

एक वेडा मुसाफीर
वाट तुडवतो पायी
आज परतुन पुन्हा
त्याला चालण्याची घाई

वाट ओळखीची तीच
तोच साद ओळखीचा
मनी लपला परंतु
जुना ओलावा प्रीतीचा

दोन मनांची जडण
हेच प्रेमाचे साफल्य
वळणात लपलेले
हेच मार्गीया कैवल्य

साद मधून काहीसा
येई कानी हळूवार
चालण्याची होते घाई
पायी लागते ठोकर

रक्त बंबाळ चरण
ठसा ठेवती मागुता
पुढे पुढे जाता जाता
मागे उरताती खंता

नीज नखरी चिरले
होते माझे अंतरंग
अंथरुणी त्याची घडी
वाट केली होती योग्य

पण तुला नको होता
माझ्या जीवनाचा जिव्हाळा
बंध तोडून सगळे
तूच कापलासी गळा

माझी प्रित मुसाफीर
चाले अंतरीच्या वाटे
पण जातानाही गेली
मार्गी लावूनीया काटे.

ग्रंथालय ठाणे
२५८० २५३२५
शाखा (स्थळ प्रत)

# तुफान

बये तू आलीस तुफानातून
गेलीस तशीच तुफानातून
घेवून अंगावर आगीचे लोट

वय तुझं तसं फारसं नव्हतं
तरीही तुला शिकवलं होतं
हसायचं कसं, दिसायचं कसं
रूसायचं कसं, नखरेल पणे
आणि हळूच घालून डोळा
हिसकायची कशी हातातली नोट

या धनकोंच्या बाजार पेठेत
लाजत मुरडत करत नखरा
मुरका मारून, गिरकी घेवून
फिरकी काढून, पुढं जायचं
अन् उरोज उघडे ठेवून
हवेत कसं नाचवायचं बोट

सुखासाठी हा नव्हता चाळा
जळून खाक झाला जवानीचा मळा
नवऱ्याचा आजार पोरांचा भार
कर्जाचा कार, चुकवण्यासाठी
मांडलीस विक्री, इथं या पेठेत
घेत घेत जहाल विषाचे घोट

बये तू होतीस जगावेगळी
आर्त कारूण्याची भयानक किंकाळी
गेला तुझा नाथ, त्याच आजारात
पोरांचाही घात, तसाच झाला
रॉकेलचा डबा अंगावर ओतून
जाळलंस अखेर तुझं रितं पोट.

# मी सरलोय

पूर्णत्वाप्रत पोहोचूनही आज
अखेर अधुरा मी राहिलोय
जीवंत असूनही उगीच वाटतं
मी सरलोय, मी सरलोय

हवालदील बनून उगाच
मी शोधतोय माझं जीवन
कारणाविना उगीच जळंतय
विशाल विश्वातलं अणु येवढं मन




नव्या प्रेरणांच्या उमेदीस पुन्हा
टाकतात वेढून बंध जुने
हतबल मानव येतो शरणागत
बांधून गळयात रूढींचे लेणे

कणखर रूढींची खडी कमान
चढता चढता सरतो जोम
आयुष्याच्या रिंगणातही मग
संस्कृतीचे का माजते स्तोम

अन् नियतीच्या बुरख्याखाली
जाणते जीव पण गोठून जातात
माणूसकीला विसरून अंती
अमाणूसपणा घेवून बसतात

गती जीवनाची उलटी सुलटी
स्वतःभोवती घेते गिरक्या
ओशाळवाणा निस्तेज जीव
अखेर भुजतो निंदेस परक्या

# भल्या जगणाऱ्या

भल्या जगणाऱ्या जगत जा
मधूनच मरणाला स्मरत जा
स्मरून त्याला पुजत जा
मरून मागे उरत जा

हा नियतीचा वेडा छंद
नाही होणार कधीच बंद
जगणाराचे जगणे धुंद
मरणाराचे मरणे अंध

ज्याचा बसतो मेळ जसा
देतो घेतो पसा पसा
या विश्वाचा खेळ असा
कुठे करावा नियम कसा

फुलून जळून माती होतो
मलाच मी खावून घेतो
एक एक क्षण जगत जातो
एक एक क्षण मरत जातो.




# विसरलेले गीत

का अशी घडावी या जीवनी आगळीक
ना आज आठवे पुन्हा शब्द ही एक
ज्या सुरात सूर मिसळूनी बसतसे गीत
त्या तिथे तरूतळी विसरले गीत

ते गीत नव्हे तर खरी असे आगळीक
मन दोन जीवांचे बनले तिथेच एक
मग अमूर्त जे ते मूर्त होवूनी ज्ञात
त्या तिथे तरूतळी विसरले गीत

स्वर कोमल कंठातला मुक्त होतो
मी बनून वेडा उगीच शोधत बसतो
परी मला न गवसे जो अर्थ साठला त्यात
त्या तिथे तरूतळी विसरले गीत

त्या गीताच्या आठवाने स्मरते मूर्ती
मग जीवा लाभते स्वये आगळी स्फूर्ती
त्या स्फूर्ती संगे क्षण बनता एकांत
त्या तिथे तरूतळी विसरले गीत

छत्र शिरावर धरे वृक्ष कडकडीत उन्हात
ते गीत कोरले त्याच्या त्या पानात
ती पर्णे गाती मजला परी हिणवित
त्या तिथे तरूतळी विसरले गीत

मी दूर ठाकूनी घेतो कानोसा परी
ती दिसे न मजला मधुर गान सुंदरी
ती नसेच तेथे असे भयाण एकांत
त्या तिथे तरूतळी विसरले गीत

ज्या मीच कोरल्या त्याच विसरलो खुणा
तन दगड बने परी मन हे आठवे पुन्हा
होवूनी विव्हल परी ना गवसे तो अंत
त्या तिथे तरूतळी विसरले गीत

# नाते

मरण्यात आनंद, जगण्यात भय मानणाऱ्या दुनियेचा
मी एक वारसदार आहे.
जीतेपणी जाळू पहाणाऱ्या वखवखल्या प्रलयी नजरांचा
मी वेडा अधिपती आहे.
आग आंगावर घेवून जळत होरपळत जगण्याचा माझा सोस
माझ्या जन्माइतका जूना आहे.
रोज जीतेपणी मरून पुन्हा जन्मण्याचा खंबीर वारसा
मला तुम्हीच दिला आहे.
मस्तीतल्या जगण्याच्या धुंदीतले अंधपण डोळ्यात साठवून
मी दूथडी भरून वहातो आहे.
विश्व विधात्याच्या वैश्विक संतुलनाच्या नियमनाचे नाते माझे
स्मशानाशी मी विसरलो आहे.

# शून्य

जगण्याच्या सगळ्याच वाटा
आता प्रवाही झाल्या आहेत
त्यांचा ओघ बंदिस्त करणारी
ठोस टणक भूमि जिणगाणीत
कुठंच शिल्लक दिसत नाही
वारेमाप वाढल्या सगळ्या पसाऱ्याने
गुंता जगायचा वाढवलाय
ओलावा वाळलाय सारा
आशेला आसक्तीच खग्रास ग्रहण लागलय
जगणं मरणास जिंकणार नाही
हे ठाऊक असूनही
मनाची चोरी झाल्यावर
वहिम कोणावर ठेवायचाच नाही
हे कळल्यापासून
मी बेरीज केलीच नाही कधी
कारण
तेव्हापासूनच मला आवडते
वजाबाकी
नेहमीच शून्याकडे जाणारी



# तेज प्रभेचे

ज्यानी जोखलं नाही
बळ स्वत:च कधीच
सभोवती भरलेल्या बाजार पेठातून
अशा बुळग्यांच्या सहानुभूतिच्या
शब्दांची मी धरावी आस
कशासाठी.
कशासाठी
बाळगावी भिती
वेडचा अंधाराची
माणसाला माणूस म्हणून हिनवून
जनावरासारख्या वागवणाऱ्या
अंधारबनातच रहात असताना
कशासाठी
मी माझं म्हणावं कुणाला
माझ्या जन्माचीच करून माती
तिच्यावर उदंड घेवून पीकं
माझेच भाजून चिरे
आपली सिंहासन बांधणारांना
कशासाठी
मी जोखड घ्यावे मानेवर
आंधळ्या सारथ्याच्या रथाचे
स्व–सामर्थ्याने का झुगारू नयेत
साऱ्याच बंदीस्त चाकोऱ्या
केवळ तेज प्रभेचेच जपण्यासाठी

# माणूसपण

दानवांच्या बाजार पेठेत जन्मलास तेंव्हाच
आईच्या स्तनपानातूनच प्याला असशील
लाख गरीबांच्या उष्ण रक्ताचे थेंब
त्याच्यावरच वाढलाय तुझा पिंड
आणि निर्दय कठोर सुखलोलुप मन.

पण जगणारांच हे जग विचित्र आहे
पोटाला चिमटा देवून वचनाला जागणारे भेटतील
कसायांच्या काळजाचे हत्यारे असतील
काही शांत, धिरगंभिर ज्योतीसम जळतील
अनेक माथेफिरू सुडान पेटून जगही जाळतील

पहा यांच्यात तुझ्याकडून दुखावलेला कुणीतरी
आपल्याच देह सामर्थ्यानुसार धडपडत जगत असेल
त्याच्या वर्तनाचा बाण आता त्याच्याच हातात आहे
सावध होवून तोही आता डून धरूनच असेल
कारण तुझ्या काळजाचा वेध घेण आता त्याच्या बाणात आहे.

नको करू खळखळ आता केलेल पाप फेडाव लागत
धर्म आहे तो नियतीचा चुकवता येणार नाही
पापाच माप पदरात घेताना दानत ठेव
टाक ओरबाडून तूच तुझा फसवा मुखवटा
त्यानच तुला आता माणूसपण मिळणार आहे.

# प्रश्न

न उमगणाऱ्या पाऊल खूणांचा
वेध घेत जगण्यात
नेमक काय साधायचय
हे ज्या भविष्याला कधीच
कळल नाही, त्यान
जगण्याच्या आलाव्यात नाचून
आपली आगतिक पावलं
सारिच का जाळून घेऊ नयेत ?

उगवत्या पुढं नतमस्तक होऊन
मावळत्याच्या पाठीत लाथ घालणाऱ्या
षंढांच्या फौजेचे आधिपत्त्य करण्यापरिस
काळजाचे काप
विक्रीस मांडावेत भरल्या पेठेत
नाहीच मिळाले गिऱ्हाइक तर
खुशाल का कुजू देवू नयेत ?

मेलेल्यांच्या थडग्यातले जीवंत हुंकार
कधीच कानात घुसू नयेत म्हणून
कानात ओतून शीसं
उघडया डोळयांना स्वत:च्या
समजून केवळ खाचा
जगणाऱ्या भेदरटांनी
धरतीला खुपणारा कण्हता भार होऊन
हिंस्त्र गिधाडांचे अन्याय का सोसू नयेत ?

# गुंता

अलगद हळव्या मोर पीसा सारखं
माझ्यातलच काही हरवून बसलो
तेव्हा त्याची नोंद करता आली नाही
भटकत वणवण मी सारं शोधलं
पण हाती माझ्या काहीच नाही लागलं

आज तो कोपरा तसाच रिकामा ठेवून
जगताना अनामिक कळ आवर्जुन उठते
स्मरणाचा हलकल्लोळ माजवून ही
काळजाच्या कोपऱ्यातल्या थरथरत्या आवेगाला
अजुनही मला रोखता आल नाही

शोधाशोध जुळवाजुळव करताना उगीच
आठवांचा एक एक टाका उलगडत जातो
विणल्या गोफाचे गोफपण सरून जाते
होतो धाग्यांचा न उलगडणारा गुंता
त्यातच मी माझेपण गुंतवून बसतो.




# कुठवर चालायच

हे कुठवर असच चालायच
तोंडमातूर न्हाय कुठ उघडायच
सार कस मुकाट्यान घुटकायच ?
वाल्ह्याच्या डोइवरचं सात रांजन पाप
एकट्या रामान संपवायच
पांडवांची बेसावध मारून पोरं विश्वत्याम्यान
डोइवरच्या जखमेसाठी
तेल मागत जगायच - - -
राज्यगादी लागून रामान
पितृभक्ती मिळवायची
लक्ष्मणान करून साथ
बंधू प्रीती मिरवायची
सीतेनेच रामायण सार
आपल्याभवती फिरवायच
कशासाठी उर्मिलेन अंधारातच खितपायच - - -

कुंतीची तीन आणि माद्रीची दोन पोरं
अखेर पांडवच बनायची
पतिव्रतेच्या गांधारीच्या कुसीतून
कौरवच सार निवजायच - - -

दानशूर कर्णाचा
दानधर्म जोपासून
कवचकुंडल घेवून त्याचीच
अखेर नितीतज्ञ कृष्णानच त्याला
बकरा बळीचा बनवायच - - -

उरबडवणारे
आदर्श आमचे
आणिक
जीव गुदमरणारे दोष
याना कवटाळून, उरासी आपण
उगवणार दिवस सारं
नुसत पुढती ढकलायच - - -
महाभारत, रामायण
सार आमच
लाख लाख मोलाच
आज पुन्हा आम्ही
त्याची पुनरावृती करायची
आदर्शातल्या मारून किडीं
कधीपसन आपण जगायच - - -
हे असच कुठवर चालायच
कुठवर चालायच

# टीळा गंधाचा

तुझे ते देवघर पहिल्याने जाळून टाक
मग जाळ तुझे ते दगडी मन
ज्याच्यावर देवाधर्माचेच काय
साध्या माणूसकीचे संस्कारही होणार नाहीत कधी.
नटव्या थाटापाठी लागलेल
तुझ भोगी शरीर
जळून इतरानाही जाळणार आहे
कशास हवेत कपाळी सुचिर्भूत गंधांचे टीळें
ते नाहीत समर्थ लपवण्यास
गढूळ, कुबट, घृणास्पद मनातील दुर्गंधी
सतत वर्तनात येणाऱ्या
दोलायमान संदर्भ चौकटी तुझ्या
आत्म्याच परिशिलन काय करतील
तो टीळा गंधाचा फसवा उगीच
इथून पुढे कधीच लावू नकोस कपाळी

# शिल्प

माझ्यातले मीपण सरते
माझाच मी नसताना
होते सारेच शांत
डोळ्यांच्या मिटतात पापण्या
आश्रूना वाट देताना
सोनेरी दिवसांची सारी मोरपीसं
वाऱ्यावर उडून जातात
आणि उरतात मागे
घटनांचे दुधारी बाण
काळजात खोल रूतून
माझ्या कवितांच्या ओळी
माझ्याच साठी दोर बनून
लावतात मलाच गळफास
तेंव्हा मी मात्र डरत नाही
होतो बेफिकीर कलंदर
मृत्यूच स्वागत करतो
तो बेटा येण्या आधीच
तू चोर पावलानी येतेस
आळवीत त्याच ओळी
मग मी माझाही नसतो
अस्तित्वाच्या पार पल्याड
माझे होते शिल्प
युगानुयुगाचे

# मिलनाधीरा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६८
२५९२०
२५५५०५
शाखा (स्थळ प्रत)

ही छैल छबेली नार, मदन अंगार, लाजरी अबला
अती अधीर झाली प्रियास भेटायाला

अधराची लाली द्विगुणीत आता झाली
मृदू गालावरती हास्य कलिका खुलली
नयनातून तो भावभाबडा बोली
मनोमनी दंग गोडह्या संग वेध घेतला ।। १ ।।

बट भाळावरची खुलवी अधिकच चेहरा
चीर तारूण्यावर मात करी जो पूरा
केसात माळला शुभ्र पांढरा गजरा
रोखला श्वास मनी हव्यास, वाटू लागला ।। २ ।।

हा वर्ण केतकी लपला शालू आड
उरोजांची कंचुकी उगीच सांगे चाड
उडवी पदरा वारा अतिशय द्वाड
हास्य दिलखुले, गाली वाहीले, पदर तो ढळला ।।३।।

रूणूझुणू पैंजण पायातील वाजती
हृदयाची धडधड अती वेगे चालती
शाहरे सणाणून काये वरती येती
ती लाजवंती लाजली,मनामध्ये भ्याली,चेहरा झुकला ।।४।।

का दिङमूढ मग ती एकाएकी बनली
त्या तिथे तरूतळी दृष्टी का ती खिळली
ती तसीच राहून स्वत्वा विसरून गेली
स्पर्शतो जूना, कालचा पून्हा, जाणवून गेला ।। ५ ।।

# अनोखा शाप

तू दिलेला शाप अखेर वरदानच ठरला
जळाला पारिजात परी सुगंध त्याचा उरला

ना खंत, ना चाड, ना आशा करमाची
न अभिलाशा मजला पुर्नमिलनाची
होतो तसाच राहिलो अजून ही निवांत
सभोवतालचा अंधार ना कधी उजळला

उरी दाटलेल्या तिमिरात ही सुप्त
प्रखरतेने पाजळणारी इवलीशी ज्योत
अंधुकश्या प्रकाशात उजळणारी उजळणारी वाटूली
देते दिलासा मरगळल्या जीवाला

झोडपणारा पाऊस गार चावरा वारा
झाकाळल्या आकाशाचा दु:खद सुस्कार
चराचरासाठी देऊन जातो जीवन
आयुष्यातील तुफानांचा भर आता ओसरला

जळणारा अंगार तसाच जळत जातो
परस्परास्तव तो सर्वस्व गमावतो
त्याहून ही वेगळे हे मानवी जीवन
स्वार्थासाठी माणूस माणूसकी विसरला

सगळेच बनतात गुलाम परिस्थितीचे
मिरवतात बडेजाव अन् चांगुलपणाचे
धरून हातासी पांगूळ गाडा प्रेमाचा
तसाच होतो चालत पण तोल गेला

चुकून झाली चूक अन् कळाली नंतर
पण सावरणार कशी आवाका सुटल्यावर
फुकटची धडपड आणि फुकाची रडारड
निरर्थक लाजीरवाणा प्रयत्न तारी कशाला

होत घडवल रामायण विशुद्ध भावनेन
त्याची छकले छकले उडाली वासनेन
अखेर प्रबल खरी ठरली पापी शक्ती
शुद्धतेचा सारा अंश एकाएकी लोपला

तापलीस कोपलीस अन् अखेर शापून गेलीस
पण शाप तुझा माझ्याकडे राहिला आहे ओलीस
जागवतो झोपवतो रोज करून मुजरा
माझे सामर्थ्य लावतो मला आजमावयाला

शापातून मिळाली दिव्यशक्ती जोपासतो
माझा मीच दिवसे दिवस सामर्थ्य वाढवतो
वज्रालाही फोडीन एका धडकी सरसा
हीच प्रेरणा बनवते बलवान मनाला

तुझ्या शापातून धगधगणाऱ्या ज्वाला
फुलवतात सजवतात माझ्या रोमरोमाला
कणन् कण शरीराचा वेड्यासम नाचतो
मौलीकत्व येते वेडातील हुंकाराला

शाप हा तुझा मी निमूटपणे सोसेन
खचितच सुखाच्या शिगेवर पोहोचेन
भेकडपणा नव्हे ही वृत्ती धाडसाची
हसतमुख आलिंगन देइन त्या मृत्युला

चिरअमरत्व नाही कुणाला ही लाभत
शापातून तुझ्या हीच उरली मिळकत
जगण्यासाठी जन्म नाशासाठी मृत्यू
अखेर कण मातीचा मातीला मिळाला

# अखेर

हळूहळू एक मिळवत जातो
एक एक हळूहळू गमवत जातो
आल्या गेल्याचा घालीत मेळ
एक एक दिवस जगत असतो

येणाऱ्याचे स्वागत करतो
जाणाऱ्याला निरोप देतो
लाख मोलाचे जगणेच आहे
म्हणून त्याचीच काळजी घेतो

निर्बंध निर्विकार रहावे लागते
जगण्याचे विष त्याने पचनी पडते
खोटा मुखवटा दाखवत जगाला
अंतरंगी काहीतरी जाळत राहतो

येणारे कढ पचवावे लागतात
म्हणूनच माणसाला माणूस म्हणतात
भावनेच्या भुतानी झपाटले जाऊन
याच माणसांचे पशू ही बनतात

पशू मानव यांची एकरूप नाती
निर्बंध जगण्याला केवळ एकच माती
लाखमोलाचे असले जरी सारे
तरी त्याची अखेर होणार आहे माती

# नाते

बसून इथे खडकावर तू मी
स्वप्न सजवले होते
कशास जडले आणिक तुटले
दोघा मधले नाते.

एकांताची घडली जादू
अंतर सरले दोघा मधले
निळया नभातील चंद्र चांदणे
पाहुन तेंव्हा हसले रूसले
आनंद वेडे त्यांचे हसणे
रडून लोपले होते.

दोष कुणाला कुणी द्यायचा
कोण कुणाचा वैरी
प्रत्येकाने परस्पराच्या
शिल्प कोरले उरी
सुखदुःखी या दोघांचे ही
आसू ढळले होते.

आठवणी सरणार कधी या
आम्ही संपलो आता
हितचिंतक ही आम्हीच आमुचे
संपून जाता जाता
गढूळल्या मनी मळभ भरूनीया
अंधारून का येते.

## घर

हे घर काही दिवस जीवंत होतं
मध्येच ते बेजान होऊन
निपचित पडलं
घराच घरपण हरवून बसलं
काय झाल त्याला
कुणाला कधिच काही कळल नाही
बिचारं दु:खी होतं, की त्यान
दु:ख गिळून आत्महत्या केली होती
कोण जाणे !

अखंड विचार भोवऱ्यात गुंतून
घरात जीव गुंतवणाऱ्यांना वाटायच
हे पुन्हा कधिच जीवंत व्हायच नाही
पडझड होऊन त्याची
एक दिवस होईल माती
मातीत मिसळण्या साठी
तेंव्हाच ते
आपल अस्तित्व टाकून देईल
बुडून जाईल मग
जाणत्यांच्या अंधाऱ्या काळीज कोपऱ्यात

अरे ! पण नवल घडल
कौलाना फुटले कान
खिडक्यांचे डोळे झाले
काळजाच्या चौकटी झाल्या
भिंतिची वस्त्र लेवून
वेड उन्हातही फुलून निघाल
फुलता फुलता मनात त्याच्या
जूना आठव गंध मुगरून उठला
आणि कोठीतल्या देवासमोरची त्याची घंटा
अविरत निनादत राहिली
जिवंतपणाचा देत दाखला
स्वर्गात पोहोचलेल्या आत्म्यांना ही.

# प्रेतयात्रा

आज उजळलेत दैदिप्यमान लक्ष दीप तुमच्या घरी
अजून त्यांच्या झोपडीत अंधारच भरतो आहे.
तुमच्या माजोरी शब्दाना घडतात साभिनय सलाम
झुंड झोटिंगांची तुमच्या मागे पुढे झुलणार आहे

तुम्ही धरलेत डूक, डंख जिव्हारी मारण्यासाठी
ओवऱ्या स्वतःच्या बांधण्यासाठी उडवलीत किती डोकी
अंध अज्ञानाच्या वृक्षावरली बांडगुळं तुम्ही
नाहीत रतीभर राक्षसाहून कमी

तुमच्या पायाखालची वाळू आज कणकण सरकते आहे
प्रलयाचं पाणी आज त्याच वाळूत मुरत आहे
सावध व्हा एक दिवस त्यांचा ही असा येणार आहे
निढळाच्या घामातूनच प्रचंड अणुस्फोट होणार आहे

होतील जमीनदोस्त तुमचे इमले मजले तेव्हाच
या धरेवरचं साठलेलं सारं पाप सरणार आहे
म्हणता ज्याना गलितगात्र आज तुम्ही
खांद्यावरून त्यांच्याच तुमची प्रेतयात्रा निघणार आहे.

# सांगावा

राजकारणातले चढउतार चढताना कधीच शिणली नाही लेखणी
नाही सुकला ओलावा मानवतेचा
नाही थांबला ओघ मराठी बाण्याचा, मुलुखाच्या प्रगतीचा
केलीत रखवालदारी धवल हिमालयाची तितक्याच धवलतेनं
राष्ट्रहिताची पताका खांद्यावर घेवून अखंड वाटचाल केलीत
कुणाची कटूता कधीच पदरात न घेता.

राजकारणाची साहित्याशी जोडलीत सोयरीक तुम्ही
मंतरले मराठी शब्द बाळबोध वळणांची
तुमचा साहित्य पारिजात दरवळतोय ध्यानामनात आजही
मायबोलीच्या ठोस बांधणीचे आवाज कानात घुमतात
आणि जागवतात आमच्या मरगळल्या मनाला
ओलावा भावनांचा देवून.

तळपत्या दीपस्तंभाच्या दिव्य प्रकाश झोतात
भारावली गलबतं प्रवास मग्न होती आपापल्या दिशांना
काळ दिवस उगवला दीपस्तंभ विझला
वादळात सापडली सारीच गलबतं दिशाहीन झालीत
पोहचणं निर्धारित स्थळी त्याना
नक्कीच जड जाईल, साहेब नक्कीच जड जाईल !

तुमची प्रतिमा, चिंतन, मनन तुमचं आमच्यासाठी
ऋषी मुनींनी दिलेला उद्धारक आशीर्वाद ठरलाय
आम्ही ही कोरलाय आमच्या अंतरंगी तुमचा वेदोक्त मंत्र
पाऊल वाटेचा राजरस्ता तुम्ही केलात
पाय अडखळत नाहीत आता चालणं हळूहळू जमेल
पण साहेब तुमची उणीव सतत जाणवेल.

# वास्तव

फसवणूकीच्या जगताचे ठरताना बळी
वाईट याच वाटतं की
कल्पतरूनाही येतात फळं विषाची
अंग प्रत्यांगावर त्याच्या.

दिसणाऱ्या पावित्र्याच्या मार्दवतेच्या वास्तवात
असंख्य काळसर्प डुखून असतात
जे शासन करायला तयार असतात मृत्युदंडाचे
जग नियंत्याला ही.
ते असतात उपभोग लालसांचे दिव्योपासक

फुलपांखरांच्या दिव्यत्वाचे
सात्वीक.

तत्त्व त्यांचे, तत्त्वज्ञान ही त्यांचे त्यांच्यापुरतेच
चिखलात वासनांच्या रूतलेले
असेच पण मिरवतात बडेजाव अहोरात्र
पतंगाच्या आत्माहुतीचा
निकोप निर्मळ.

# अस्तित्व कडा

पिसाळल्या दर्याच्या फेसाळल्या लाटांवर
मी झोकून दिलय माझ अस्तितव
कारण मला ठाऊक आहे
या गरजणाऱ्या लाटांचा आत्मा
आता माझ्यासम मृत झालाय

सुसाट वादळात सापडलेला पाचोळा
होऊन पाचोळाच जगत असतो
कदर त्याला कुठे, कशाची, केव्हा असते
कोण करतो किंमत त्याची
तो असतो सत्वहिन

असून कल्पनांचा कुबेर ही
झोळी भिकेची घेवून काखेत
मागतोय भिक तुझ्या दाराशी
कारण तू आहेस धनको
दातृत्वहीन.

अशी वादळं अशा लाटा आणि रणकंदन
जे कवेत घेवून जगणारे असतात
त्याना दैवच माहित नसत
ते जाणतात फक्त
अस्तित्वकडा.

# जगण्याचं बळ

धुंदावल्या दाही दिशा, आलं आभाळ भरून
वळवाच्या पावसान, आलं धरतीला न्हाण
बीज घातल उदरी, कूस तिची उजवली
आज साजरी गोजरी, झाली धरती माऊली
तिला लागल डव्हाळ, पूर केलं पावसान
झाली सपनात गूंग, गर्भ उदरी घेऊन
बीज अंकूरल पाटी, त्यान उघडल डोळं
त्याच्या डोईला शोभत, मऊ हिरव जावळ
श्रावणाच्या सरी संग, रान हिरव नाचत
जणू आईच्या कुशीत, पीक बाळ हुंदडत
डुले शिवारी जोंधळा, तुरा मोत्याचा लेवून
किलबिल पांखरांची, त्याच्या संग लाडावून
आंबा, बाभळ, लिंबाचा, तट शेता भवताली
पाना फुलात त्यांच्या बी, धन देवता हसली
माझी झोपडी सोन्याची, उभी पाचूच्या रानात
गुज शिवार सांगतं, हळू तिचीया कानात
दारी चांदण रूप्याच, राती सोबतीला येतं
शांत झोपल्या पिकाला, येंड्यावानी जोजावत
माझी धरती माऊली, माझा करी प्रतीपाळ
जीव जगवाया माझा, मला देई तीच बळ

# प्रतिक

खरच सार
खरेपणानं सांगायच तर
आमची आम्हाला लाज यावी
पण आम्ही तिचाच लिलाव केला
दवंडी पिटवून भरचौकात
स्वातंत्र्योत्तर काळात

सान्याच जून्या व्याख्या
आम्ही नव्यान बेतल्यात
स्वातंत्र्याचा स्वैराचार
सहकाराचा स्वहाकार
जगण सुळावरची पोळी
मरण सुटकेचा निःश्वास

आमची चंदनी संस्कृती
उगाळून स्वार्थाच्या सहानेवर
टिळा तिचा भाळावर लावून
आम्ही आम्हालाच
पाण्यात पहात आहोत
समजून देशाचे सुपुत्र

आमच्या आधू डोळ्यानी
आमच पुराण ही आधू झाल
तथाकथित आम्ही सुधारणावादी
आमच्या आदर्शाना देतो शिष्यत्व
आम्ही दिर्घकाळ ज्यांचे बटीक होतो
त्यांच प्रतिक लाचारीच म्हणून.

# ओयासिस

फिरताना आयुष्याच्या
वैराण वाळवंटात
एक भेटलं ओयासिस
जेव्हा तहानेन जीव
व्याकुळला होता
प्यायलो पाणी तृप्त झालो

काही दिवस सहवासात त्याच्या
वाळवंटाच नंदनवन झाल
फुलं ही उमलली
झाडं खजुरांची आली
जगवण्यासाठी

पण अचानक भयानक वादळात
पुसल अस्तित्वच त्यांच
वाळूच्या पर्वतप्राय ढिगाऱ्याखाली
रेतीने डोळ्यांच्या काचा झाल्या
समोरच जग नाहीस झाल
रमणीय स्मरणाने त्याच्या
आज माझ्या डोळ्यांचे
झालेत दोन ओयासिस

# वस्तूस्थिती

संभावितपणाचे लेवून वस्त्र
जगतो आहेस कसले जीणे
बुरखा फाडून पाहिले तर
दिसेल दृश्य लाजीरवाणे
पीचलेलं मानगूट तुझ
खचलेलं मन आहे
तडकलेल्या काचेच्या पेल्यात
तुझ्या संस्कृतीच धन आहे.
बोट चेपेपणा तुझा
हीच तुझी उमेद आहे
पोटासाठी शरीर विक्री
हाच तुझा धर्म आहे.
लाचार हात पसरून पुढं
भिक मागण तुझी नीति
वेळ पडल्यास पैशासाठी
विकशील पोर न्हाती धुती
चटकन घालून डोळा डावा
ताई म्हणतोस हेच तुझ नातं
वखवखणाऱ्या वासनांची भूक
हेच तुझ दैवत बनतं
माता नाही पिता नाही
भाऊ, बहिण सगळ खलास
सत्यं, शिवं सुदंरं चा तर
तुच नराधमा गळा घोटलास
थुंकल पाहिजे जिण्यावर तुझ्या
गरळ साठवून प्रलयाच तोंडात
जाळून राख केल पाहिजे तुला
विलंब न लावता एकाच क्षणात.

# चांदण्या रात्रीत

चांदण्या रात्रीत या
धुंदल्या काही खुणा
स्वप्नवेडी रात रडली
पाहुनीया वेदना - - - - ॥ १ ॥

का प्रभेचा अंत व्हावा
अंधारल्या वाटेवरी
सुखही तेथे वाट चुकते
खंत होते चावरी
का जगावे मरण वेडे
जीवनाचा बहाणा - - - - ॥ २ ॥

चालता पथ अंत नाही
पाऊले मंदावली
तरी ही पुढती जात राही
का गती ना थांबली
जायचे कोठे कशाला
शोधुनिया कारणा - - - - ॥ ३ ॥

थांबता थांबा कुठे तो
वाट माझी पाहतो
शेवटी जथ्यासवे मी
जाऊनिया थांबतो
आणि अंती सर्व सरते
संपलेली वंचना - - - - ॥ २ ॥

# गाणे

शब्दही रूसले कंठ आटला
सूर पुन्हा कधी जुळेल का
बरसत बरसत अमृत धारा / गाणे मजला स्फुरेल का ?
मीच विसरले पुरती मजला, पुन्हा कशी आठवू
आठवणी या उरी दाटल्या, कुठवर त्या साठवू
कशी सावरू पुन्हा मला मी सावरणे मज जमेल का ?

थकल्या शिणल्या या जीवाची, कुठवर खंत करू
रोज उगवला दिवस ढकलणे, असते नित्य सुरू
या त्रासाने पुरी त्रासले, सुटका यातून मिळेल का ?

स्मृति दर्पणी तुला पाहते, तृप्ती तरी ना होई
रोज नव्याने नवी वेदना, अन् जगण्याची घाई
जगण्यासाठी जगत राहणे, कधी खऱ्याने जगेन का ?

अशी अनामिक ओढ जिवाला, थोडी थोडी सलते
आणि अखेरीस मन शरीरातील, अंतर वाढत जाते
साकाराया मूर्त भावना, अंतर सारे मिटेल का ?

न कळत बसल्या रेशीम गाठी, आज शृंखला झाल्या
आणि तारण्या जीवन माझे रूप प्रभूचे ल्याला
या प्रभूरूपे गूढ साठले, ते सारे मज कळेल का ?

# असलेच जगणे

शोभणार न शोभणार सारच करतो ना ?
उघडचा आणि झाकलेल्या डोळचानी
पण कधीतरी खावून चपराक
होतो जागे.
विचारांचे पोत अचारांची नीति
पाळतो तुडवतो कधी पायदळी
त्या मागे अवघे एकच कारण
आंधळा स्वार्थ
सोड स्वार्थ गाढून टाक त्याला
भूत होवून बस त्याच्या मानगुटावर
डोळसपणे होवून बेफिकीर
टाक पाऊल.
बेफिक्रीर चालीने पावल ही रक्ताळतील
मग नाही पुन्हा माग फिरता येणार
वहाणाऱ्या ओघातच वहाव लागेल
प्रवाहा बरोबर
आर्त कारूण्याची किंकाळी तुझी
कोण ऐकतय जगात वेडचा
जो तो व्यापानी व्यापलाय पुरता
आपापल्याच.
झोपलेल्या मनाला जाग करून चल
दुधारी हत्त्यार अन्यायावर घेऊन
मनसोक्त खचाखच करून वार
कर त्याला ठार,
असलेच जगणे जगायला शिक
अनंतातला होवून एक कण तेजाचा
पुकारून बंड अन्यायाविरुद्ध
डोंब हो आगीचा.

# किमया

नकोस लपवू मनात तुझीया
मधुगंधान्वित शुद्ध भावना
किती आजला मला गवसल्या
तव प्रितीच्या सुखद खुणा

तुझा सुगंधी गंध जीवनी
फुलला कातर वेळी
आणि जाहली किमया सारी
मौलिकतेच्या वेळी

अधुरे सारे पूर्ण जाहले
लेवून अभिनव तेज
स्वप्निलतेवर तूच चढवला
सत्यान्वेशी साज

काय उणे मज आता पुढती
सहज सर्व लाभले
आणि तुझीया सहवासाने
जीवन सारे फुलले

आता कोठे नाही अडणे
जाणे मजला पुढती
सुखःदुःखे या माझ्या संगे
तूच खरा सोबती

प्रवास आता सुरू जाहला
स्वप्ने साकाराया
आणि सुकर तो सर्व जाहला
ही तर तुझीच किमया

# भुपाळी

करूणार्णव तू उठ राजसा । मंगल समयाला
पूर्व दिशेतून उधळीत कुंकुम । रविकर आला आला.

द्विजगण अवघे जागृत होऊन । साद तुला घालती
कुंभ घेवूनी कटीवरती या । ललना पाण्या जाती
क्षिरपानासी वेळ जाहला । पाडस हंबरते
मुदित मनाने धरतीवरती । स्फूर्ति संचरते

प्रभातकाळी भक्त मेळ हा । दारी तुझीया आला
होऊन जागृत आशीर्वचावे । तू या सर्वाला
प्रभातकाळी तव स्तोत्राने । मन पावन व्हावे
आणि लाभल्या दिवसाचे मग । सुवर्ण होऊन जावे

तुझ्या रूपाने अरुप व्हावे । माझ्या अंतर्यामी
पूर्णत्वाने विसरून जावे । मी पण तुझीया नामी
धाव पाव गा आता अनंता । जीव हा व्याकुळला
सोडून नीज धामा तू यावे । उद्धरण्या मजला.

# झोळीच भान

मी भिकारी धरेवरचा
भिक सारखी मागतो आहे
वाढा मला अनंत हस्ते
माझा खळगा रीता आहे
रीता खळगा भरण्यासाठीच
सतत सतरा वर्षे गेली
भूक कधीच शमली नाही
उलट भूकेची आगच वाढली
पंचेंद्रियांची करून तोंडं
शडः विकारांना ही गिळल आहे.
घावूक किरकोळ सार मिळून
हावऱ्यासारख गिळल आहे
झोळी भिकेची काखेस लावून
दारन् दार मी टिपतोय
कल्पकतेच्या कुबेरा घरी
माझा आलख मी बोलतोय
तिन्ही काळ तिन्ही वेळ
माझ्या भूकेला खंड नाही
सदासर्वदा राहून भिकारी
भीक मागण्यास लाजत नाही
घरदार निसर्ग समाज
सगळ्याकडे माग मागतोय
उदार हस्ते देतात सारे
त्यानेच मी धन्य होतो
जीवनभर भिकारी राहून
जीवाच्या झोळीत टाकाव ज्ञान
आणि अखेर सरताना ही
त्याच झोळीच रहाव भान

# झाड बोलतय

अंगारा, धुपारा, मंतरलेला दोरा
पेटी, ताईत सार देतय
आमच्या गावातल झाड बोलतय
आमच्या गावातल झाड बोलतय

तानपीम्हस कस्यान आटली
नांदती पोरगी कशान उठली
कोण कुणाला घालतुया देव
करतुया चेटूक भुताचा नाच
सासूचा सुनेला कशासाठी जाच
साती आसरा लागीर हाडळ
त्याच्याच हातात समदयांची कळ
सुमार जागा ठाव ठिकाणा
समद समद धडाधड सांगतय
आमच्या गावातल झाड बोलतय
आमच्या गावातल झाड बोलतय

साऱ्या मुलखात म्हाजूर झालय
देवान आपल ठानांक सोडलय
बसलाय त्योच झाडात म्हण
देवबी मोठा सोदयाच हाय
देवळ सोडून माणसात घुसलाय

कस काय की गडचा हे आकरीत घडल
वरच्या आळीच्या आकनीला देवपण आल
मोकळ कयास हाताची मिठी
देवाच झाड खेकाळत नाचतय
आमच्या गावातल झाड बोलतय
आमच्या गावातल झाड बोलतय

माणसांची नुसती झुंबड पडतीया
बाई बी झकास कमाई करतीया
समदयास्नी दिऊन चिमूटभर राख
नवसे गवसे समदेजण जमत्यात
गावातले ठगे बी बाईसंग नाचत्यात
परवा रातीला इपरीतच घडलं
देवाच्या झाडाला जोकायच ठरल
हातावर ठेवताच चुलीतला इंगूळ
समद पितळच उघड पडलय
आमच्या गावातल झाड बोलतय
आमच्या गावातल झाड बोलतय

REFBK-0025387